# आध्यात्मिक काव्यसंग्रह



## मनोगत

‘मी विज्ञानाचा विद्यार्थी असल्यामुळे मला संशोधनात्मक प्रबंध सोडून व्यवहारातील गद्य किंवा पद्य भाषेत काही लिहायची सवय नव्हती. वर्ष १९९४ मध्ये माझे गुरु प.पू. भक्तराज महाराज (बाबा) यांनी मला सांगितले, ‘‘माझ्या गुरूंनी मला आशीर्वाद दिला होता, ‘तू किताबों के उपर किताबे लिखेगा ।’ मी भजनाचे एकच पुस्तक लिहिले. माझ्या गुरूंचा आशीर्वाद मी तुम्हाला देतो.’’ त्यांच्या आशीर्वादामुळे ऑगस्ट २०२० पर्यंत सनातनच्या ३२५ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ८० लाख १८ सहस्र प्रती प्रकाशित झाल्या आहेत. असे असले, तरी मला कविता लिहिता येत नव्हत्या. ‘प.पू. बाबांनी मराठी भाषेत १२२ भजने लिहिली आणि हिंदी भाषेत २१ भजने लिहिली; पण मला एकही कविता लिहिता येत नाही’, याची माझ्या बाह्यमनाला खंत जाणवत नसली, तरी अंतर्मनात कुठेतरी असावी. त्यामुळे प.पू. बाबांनी माझ्याकडून पुढील कविता बोलतांना सहजतेने बोलून, तसेच लिहून घेतल्या. यावरून ‘गुरूंचे शिष्याकडे किती बारीक लक्ष असते आणि ते शिष्याला ज्ञात नसलेल्या त्याच्या इच्छा कशा पूर्ण करतात’, हे माझ्या लक्षात आले. त्या कविता या ग्रंथात दिल्या आहेत.

गुरूंच्या, म्हणजेच भगवंताच्या आशीर्वादामुळे ही काव्यगंगा निर्माण झाली आहे. गंगेचा प्रवाह काही ठिकाणी धबधब्याच्या रूपात, तर काही ठिकाणी शांत आहे. त्याचप्रमाणे या काव्यसंग्रहातील काही कविता मारक स्वरूपाच्या, तर काही तारक स्वरूपाच्या आहेत.

साधकांना या कवितांच्या माध्यमातून काही शिकता आले, तर हा काव्यसंग्रह लिहिण्याचे सार्थक होईल. तसे व्हावे; म्हणून प.पू. बाबांच्या चरणी प्रार्थना !’

– डॉ. जयंत बाळाजी आठवले (९.६.२०२०)

# अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]


१. समर्थ रामदासस्वामी आणि परात्पर गुरु डॉक्टर यांच्यातील साम्य ! ११

२. परात्पर गुरु डॉक्टरांनी केलेल्या कविता ११

२ अ. मोठ्या कविता ११

* अध्यात्मशास्त्रावरील काव्यरचना ११
* 'शिव-अवतार शामराव महाराज' यांच्या चरित्राच्या मनोगतामध्ये त्रिमूर्तींच्या चरणी केलेली प्रार्थना १७

२ आ. मध्यम कविता २०

* धर्माभिमान नाही, धर्मभाषेवीण । २०
* असुरांवर केलेल्या आरत्या २१
* घरोघरच्या कटकटीची आरती आणि तिच्यावरील उपाय २२
* बालसाधिका कु. करुणा मुळे हिच्यामुळे शिकायला मिळाले पुन्हा कविता करणे ! २४

२ इ. लहान कविता २६

* काव्यरूपी प्रार्थना ! २६
* गा भक्तराज भजना । २६
* प्रभूनामाच्या महतीची जाणीव सर्वा व्हावी । २६
* कोकणस्थ किंवा देशस्थपेक्षा स्वस्थ (आत्मस्थित) व्हावे ! २७
* अकर्म कर्माला पाप-पुण्य नसे । २७
* प्रयत्नांती असाध्य काय आहे ? २८
* काव्यातून सहजतेने आपल्या व्यापक कार्याची जाणीव करून देणारे परात्पर गुरु डॉक्टर ! २९
* साधिकेला सेवेला येण्यास उशीर झाल्यावर केलेली कविता ३०

* स्वाती, कविता करण्यात तू जिंकलीस मी हरलो । ३१
* भाव-भक्तीत तहान-भूक हरपलेली स्वाती । ३१
* किड्याचे मनोगत ३२
* प.पू. डॉक्टरांनी कविता करून साधकांच्या नावे प्रसिद्ध करणे ३२
* बासरीवादक पंडित गिंडे यांच्यावर केलेली कविता ३४
* मलम लावणाऱ्या साधकावर सुचलेली कविता ३४
* गाणे गाण्याची विशेषता ३४

३. 'स्थूलदेहा असे स्थळकाळाची मर्यादा ।' या कवितेच्या संदर्भातील सूत्रे ३६

४. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी रचलेले 'शक्तिस्तवन' आणि यांविषयी परात्पर गुरु पांडे महाराज यांनी केलेले विवरण ४२

५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'कधी येशील मनमोहना ।' या कवितेवर प.पू. डॉक्टरांनी लिहिलेली कविता, तिच्यावर साधिकेने लिहिलेले विचार आणि 'एक विद्वान' यांचे भाष्य ५५

६. परात्पर गुरु डॉक्टरांना श्रीकृष्णावर सुचलेली चारोळी आणि त्यावर साधिकांनी व्यक्त केलेले विचार आणि कविता ५९

७. प.पू. डॉक्टरांनी केलेली 'रामनाथी आश्रमातील काही साधिका । गमती जमती कितीतरी करिती !' ही कविता आणि तिच्यावर साधिकांना स्फुरलेले काव्यरूपी विचार ६१

८. प.पू. डॉक्टर आणि साधक यांच्यात झालेले प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष काव्यमय संवाद ६३

९. प.पू. डॉक्टरांनी सनातन संस्थेच्या अंतर्गत शुद्धीकरण मोहिमेच्या अगोदरच्या परिस्थितीवर आधारित केलेली काव्ये आणि त्यांवर सद्गुरु डॉ. वसंत आठवले अन् 'एक विद्वान' यांचे भाष्य ७७

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.